**Newspaper: LOKMAT**

**(Sub Edition- "HELLO PUNE")**

**Date: 05th July, 2020**

लोकमत

## चर्चेतील व्यक्तीशी थेट संवाद

गुरूचे महात्म्य प्राचीन काळापासून वादातीत आहे. 'गुरु गोविन्द दोऊ खड़े, काके लागूं पांय।बलिहारी गुरु अपने गोविन्द दियो बताय।।' अशा पद्धतीचे गुरु-शिष्याचे नाते होते. गुरुचे स्थान देवाइतके महत्त्वाचे होते. गुरूही माझा शिष्य चांगल्या संस्कारात घडेल अशा पद्धतीने काम करत होते. गुरुकुल चालवण्यासाठी राजे, धनिक लोक, मुलांचे पालक आपले कर्तव्य म्हणून मदत करत असत.

# ...तर पुन्हा वैभवशाली समाज निर्माण होऊ शकेल!



एस. के. जैन

गुरु आणि समाजाचे नाते उच्च प्रतीचे होते. आता दुर्दैवाने तसे चित्र समाजात दिसत नाही. आत्ताच्या पिढीला घडवण्याचे सुरुवातीचे काम पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षक करत असतात. मात्र त्यांना मिळणारा आर्थिक मोबदला अपुरा आहे. त्यांना आर्थिक आणि सामाजिक मान मिळत नाही. समाजाची मुल्ये जपणारे लोक कमी होत चालले आहेत. गेल्या ७० वर्षांमध्ये मूल्ये जपणारे लोक कमी होत चालले आहे. प्रत्येक व्यक्तीला 'शॉर्टकट'ने यशस्वी व्हायचे आहे. सध्या प्रत्येक क्षेत्रात हीच परिस्थिती पहायला मिळत आहे. याचे कारण त्यांच्यावर योग्य संस्कार झाले नाहीत. या परिस्थितीला बऱ्याच अंशी समाज जबाबदार आहे. मुलांना घडवणाऱ्या शिक्षकांबद्दल समाजात आदराची भावना पहायला मिळत नाही.




पूर्वप्राथमिक, प्राथमिक शिक्षकांना पुरेसा पैसा आणि प्रतिष्ठा मिळाली तर त्यांच्याकडून नक्कीच चांगली पिढी घडवू शकेल. आजच्या काळात गुरु-शिष्याच्या नात्यापेक्षा शिक्षण देणारी संस्था आणि शिष्य यांच्यातील नात्याला महत्त्व आले आहे. चांगल्या पायाभूत सुविधा देणाऱ्या संस्थांमध्ये शिक्षण घेण्यास प्राधान्य दिले जाते. ज्या देशात गुरुला देवासमान मानले जात होते, तिथे आता सरकारदरबारी शिक्षकांना 'शिक्षक सेवक' असे बिरुद लावण्यात आले आहे.

नोकरी मिळवण्यापासून मान्यता मिळवेपर्यंत अनेक कामांसाठी शिक्षकांना सरकारदरबारी खेटे घालावे लागतात. राजकारणी लोकांची, धनिकांची मदत घ्यावी लागते. त्यामुळे शिक्षकांना त्यांच्याबद्दल उपकाराची भावना बाळगावी लागते. विद्यार्थी आणि समाजापेक्षा संबंधित भागातील नगरसेवक, राजकारण्याबद्दल उपकाराची भावना असते. शिक्षणासाठी संघर्ष, नोकरी मिळवण्यासाठी धडपड अशा ओझ्याखाली शिक्षक तयार होत असतात. अशावेळी पुढची सक्षम पिढी घडवण्याचे काम त्यांच्याकडून कसे होणार? त्यामुळेच खाजगी क्लासची संस्कृती उदयाला आली आहे. मात्र अजूनही वेळ गेलेली नाही. समाज निर्माण करायचा असेल तर राजकारणी, धनिक यांनी शिक्षणाकडे कर्तव्याचा भाग म्हणून पाहिले पाहिजे.

शिक्षकांना समाजात सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे. तरच मूल्ये जपणारा समाज दर्जेदार निर्माण होऊ शकेल. शिक्षकाला पुन्हा गुरुचे स्थान मिळाले पाहिजे.'शिष्य ?सा चाहिये, जो गुरु को सब कुछ दे..गुरु तो ऐसा चाहिये, जो शिष्य से कुछ ना ले', अशी भावना तयार झाली पाहिजे. मेहरबानी म्हणून नाही तर कर्तव्य म्हणून शिक्षकांसाठी मदतीचा हात पुढे आला पाहिजे.

समाजातील त्रुटींना शिक्षणपद्धती जबाबदार आहे. शिक्षणपद्धती बदलली आणि शिक्षकांना गुरुचे स्थान मिळाले तर वैभवशाली आणि मूल्यांवर चालणारा समाज निर्माण होऊ शकेल.